# अरब लोकशाही संघर्ष

## चन्द्रशेखर पुरन्दरे

*इजिप्तमध्ये राजकीय उलथापालथ सुरू होती त्या धामधुमीच्या काळात हा लेख पाठवण्यात आला होता. अंक प्रकाशित होण्यास उशीर झाल्यामुळे होस्नी मुबारक यांची आजची अवस्था या लेखातून स्पष्ट होत नाही हे साहजिकच आहे. असे असले तरी उत्तर आफ्रिका, मध्य पूर्वेतील आखाती देश व इस्रायल-ब्रिटन-अमेरिका यांचे व्यापारी हितसंबंध या देशातील वांशिक राजकारणाला कशी कलाटणी देतात हे या लेखावरून स्पष्ट होते - संपादक*

डिसेंबर २०१० पासूनचा मध्यपूर्व आणि उत्तर आफ्रिकेतील क्रांतिकारक घडामोडींचा आढावा या लेखात घेतला आहे. या आढाव्याआधी या सामाजिक संक्रमणातून उद्‌भवणारे काही महत्त्वाचे मुद्दे भारतीय सामाजिक संक्रमणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, म्हणून ते प्रथम नमूद करतो. जानेवारी-फेब्रुवारी २०११ मध्ये ट्युनिशिया व नंतर इजिप्त येथे प्रस्थापित राजवटीविरुद्ध शांततापूर्ण निदर्शने करून बहुसंख्य जनतेने तेथील हुकूमशाही संपुष्टात आणल्या. मात्र येमेन, सीरिया, लिबिया, बहारिन अशा इतर अरब देशांत प्रचंड प्रमाणात विरोध असूनही हुकूमशहा शांतपणे सत्ता सोडतील असे दिसत नाही. किंबहुना सीरिया, लिबियामध्ये तर मोठ्या प्रमाणावर हत्याकांडे सुरू झाली आहेत. लष्कराच्या, प्रसंगी भाडोत्री विदेशी मारेकऱ्यांच्या जोरावर विरोधकांना गोळीबार, बॉम्बहल्ले, हवाईहल्ले अशा सरकारी दमनशाहीला सामोरे जावे लागत आहे.

पहिला मुद्दा असा, की अशा वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर ‘पोलीस’ म्हणून काम करू शकणारी एखादी शक्ती असावी का? आजवर जगात ही भूमिका अमेरिका आगंतुकपणे करत आलेली आहे. त्यामागे नैतिकतेपेक्षा अर्थातच अमेरिकेचे व्यापारी व राजकीय हितसंबंध असतात. पण प्रश्न तो नाही. जगातल्या कोणत्याही भागातील अमेरिकेचा हस्तक्षेप मला नेहमीच निषेधार्ह वाटतो. पण उद्या, समजा, खैरलांजीसारख्या घटना भारतभर चालू आहेत त्याहून प्रचंड प्रमाणात घडू लागल्या. त्यावर स्थानिक, प्रादेशिक किंवा केंद्रीय सरकारचे नियंत्रण तरी नाही किंवा हे सरकारच या अत्याचारांना कारणीभूत आहे असे दिसून आले, अगदी यादवीची परिस्थिती आली तर देशाबाहेरून हस्तक्षेप न्याय्य ठरतो का हा मुद्दा आहे, किंवा काश्मीरचे उदाहरण घेऊ. काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र व्हायचे असेल तर अमेरिकेने सैन्य पाठवून, प्रसंगी भारत व पाकिस्तानांशी लष्करी मुकाबला करून काश्मीर स्वतंत्र करणे मान्य होऊ शकते का?

या प्रश्नाचा आणखी एक पैलू आहे. सध्याच्या वातावरणात आपल्याकडे कोणत्याही सामाजिक अन्यायाला ब्राह्मणशाही, भांडवलशाही जबाबदार असल्याचे म्हटले जाते. एकतर तसे म्हटल्याने प्रश्न सुटत नाही. तसे म्हणणे हे प्रश्नाचे वर्णन आहे, उपाय नाही. दुसरे म्हणजे जर या देशातून याच प्रकारची व्यवस्था निर्माण होत असेल तर ही व्यवस्था उलथण्यासाठी ‘बाहेरून’ मदत घेणे योग्य ठरते का? आणि ही मदत कोणतीच बाहेरची शक्ती, समजा - चीन, अर्थातच निःस्वार्थीपणे देणार नाही. म्हणजे, एका गुलामगिरीतून सुटण्यासाठी दुसऱ्या गुलामगिरीचे स्वागत करायचे का - हा दुसरा प्रश्न मध्यपूर्वेतील असंतोषाशी निगडित आहे. या प्रश्नाला देशभक्तीचाही पदर आहे. तीव्र सामाजिक अन्यायाच्या परिस्थितीत फक्त एका भौगोलिक प्रदेशात राहतात म्हणून ‘आपले’ आणि या भौगोलिक सीमेबाहेरचे ते ‘परकीय’ या व्याख्या कमकुवत होतात. उदाहरणार्थ, (लेख लिहिण्याच्या वेळी एप्रिलचा शेवटचा आठवडा) लिबियामध्ये सरकार हजारोंनी विरोधक ठार मारत आहे. विरोधकांना असणारी पश्चिमेची मदत अपुरी पडत आहे. विरोधक गदाफी या हुकूमशहाचा पाडाव करण्यासाठी जगाकडे आणखी मदत मागत आहेत. हा देशद्रोह होतो का? लेखाच्या संदर्भात हे मुद्दे ध्यानात ठेवावेत.

**पार्श्वभूमी**

डिसेंबर २०१० पासून अरब देशांनाच काय पण उर्वरित जगालाही प्रचंड धक्के देणाऱ्या राजकीय घटना झपाट्याने घडत आहेत.

उत्तर आफ्रिका आणि मध्यपूर्वेचा नकाशा यासाठी नजरेसमोर असेल तर चित्र अधिक स्पष्ट होईल. सगळ्यात डावीकडे मोरोक्को देश आहे. त्याच्यापासून सुरुवात केल्यास अल्जीरिया, ट्युनिशिया, लिबिया, इजिप्त, जॉर्डन, सीरिया, इराक, सौदी अरेबिया, येमेन, बहारिन वगैरे. ही संपूर्ण हुकूमशाहीची साखळी आहे. यातील बरेचसे देश या ना त्या युरोपियन देशाच्या (ब्रिटन, फ्रान्स, इटली) वसाहती होते. वसाहतवाद संपल्यानंतर आजच्या स्वरूपात हे देश म्हणून अस्तित्वात आले. तोपर्यंत निरनिराळ्या परंपरांच्या व पंथांच्या टोळ्या विशिष्ट प्रदेशावर हक्क सांगत असत. म्हणजे बऱ्याचशा देशांची निर्मिती कृत्रिम सीमा ठरवून झाली. वसाहतवादानंतर बहुतेक ठिकाणी एखाद्या घराण्याची हुकूमशाही बंदुकीच्या जोरावर स्थापन झाली.

ही हुकूमशाही तेव्हापासून म्हणजे, गेली किमान ४०-५० वर्षे सतत चालू आहे. सौदी अरेबियासारखा देश वसाहत नव्हता, पण त्या देशाच्या निर्मितीपासूनच आधी हिंसाचाराने व नंतर तेलातून येणारा पैसा, अमेरिकेच्या पाठिंबा यावर हुकूमशाही शाबूत राहिली.

या अरब देशांची एकूण लोकसंख्या सुमारे ३० कोटी आहे. यातील निम्मी लोकसंख्या पंचविशीच्या आतली आहे. म्हणजे या पिढीला हुकूमशाहीखेरीज राज्यव्यवस्थाच माहिती नाही. आणि

त्यांच्या आधीच्या पिढीला वसाहतवाद आणि हुकूमशाही एवढ्याच राज्यव्यवस्था माहिती आहेत.

हुकूमशाहीचे परिणाम, धोके व तोटे सर्वश्रुत आहेत. राज्यव्यवस्थेत पारदर्शकता नसते. व्यवस्था बदलणे दूरच, असंतोषालाही लोकशाहीत असते तशी व्यवस्थात्मक वाट नसते. राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार, अतिविलासी जीवनपद्धती डोळ्यासमोर दिसत असूनही तक्रारही करता येत नाही, इत्यादी अनेक.

त्यामुळे अशा व्यवस्थेविरुद्धचा असंतोष वर्षानुवर्षे खदखदत राहिलेला आहे. त्यात वशिलेबाजी, बेरोजगारी, भ्रष्टाचार याचा फटका तरुण पिढीला जास्त बसतो. या असंतोषाचा फायदा काही प्रमाणात इस्लामी मूलतत्त्ववादी घेतात. आपल्या अगतिकतेला आपल्या देशाचे सत्ताधीश तर कारणीभूत आहेतच पण पश्चिमेची भांडवलशाही विशेषत: अमेरिकन साम्राज्यवाद, उरलेले सगळेच मुस्लिमेतर जगही या अगतिकतेला कारणीभूत आहे, अशी निश्चिती न करता येण्यासारखी ढगांसारखी शत्रूंची मालिका मूलतत्त्ववादी रचतात व या तरुण पिढीतील काही जणांच्या गळी मारतात. त्यातून आत्मघातकी मूलतत्त्ववाद जन्माला येतो पण आत्मघातकी मूलतत्त्ववाद हा काही सामाजिक परिवर्तनाचा चिरस्थायी उपाय होऊ शकत नाही. त्यात असणारी हिंसा, पटणाऱ्या ध्येयवादाचा अभाव बहुसंख्याकांना (मग ते कोणत्याही धर्माचे असोत) मान्यही असणे शक्य नसते किंवा परवडणारेही नसते. ही वस्तुस्थिती धंद्याच्या दृष्टीने गैरसोयीची असल्याने पश्चिमेने आजवर नाकारली आणि संभाव्य मूलतत्त्ववाद्यांना सत्तेवर येऊ द्यायचे नसेल तर हुकूमशहांना पाठिंबा दिला पाहिजे अशी भूमिका घेतली. तेल असणाऱ्या देशांमध्ये राजकीय अनिश्चितता असण्यापेक्षा स्थिर एकाधिकारशाही पश्चिमेने आजवर पसंत केली. एका सत्ताधीशाला किंवा त्याच्या नजीकच्या वर्तुळातील व्यक्तींना व्यापारातील काही टक्का देणे केव्हाही सोईचेच. त्या-त्या देशातील लोकांचा असंतोष या पार्श्वभूमीवर पहावा लागेल.

**सद्य:स्थिती**

अरब जगातला पहिला उद्रेक डिसेंबरमध्ये ट्युनिशिया नावाच्या उत्तर आफ्रिकेतील देशात झाला. आपल्याकडे रस्त्यावर किरकोळ विक्री करणाऱ्यांचा माल कॉर्पोरेशनची गाडी अचानक येऊन उचलते, तसाच प्रकार तिथे झाला. अशा एका पीडित विक्रेत्याने कॉर्पोरेशनमध्ये जाऊन माल परत करण्याच्या विनंत्या केल्या. दाद मिळेना म्हटल्यावर त्याने कॉर्पोरेशनसमोरच स्वत:ला पेटवून घेतले आणि त्यात तो मरण पावला. मोबाईल फोनवर कोणीतरी हा प्रकार रेकॉर्ड केला मग अल्-झझीरा या अरब चॅनेलने ती फिल्म दाखवली. मग सगळीकडेच निषेध उमटला. ट्युनिशियात लोक राज्यकर्त्यांविरुद्ध रस्त्यावर आले. तेथे बेन अली या हुकूमशहाची १९८७ पासून सत्ता चालू होती. त्याने व त्याच्या कुटुंबीयांनी देश व्यवस्थित लुटला. सर्वोच्च स्थानापासूनचा भ्रष्टाचार नोकरशाहीत खालच्या स्तरापर्यंत झिरपला. इतर अरब देशांच्या मानाने ट्युनिशियात शिक्षित लोकांचे प्रमाण जास्त आहे. त्यांना भेडसावणारी बेरोजगारी आणि सामान्य नागरिकाला मिळणारी अपमानास्पद वागणूक यामुळे देशभर संतापाची लाट उमटली व ठिकठिकाणी निदर्शने होऊ लागली. लष्कराने या लोकांवर कारवाई करण्यास नकार दिल्यावर खेळ संपला हे बेन अलीच्या लक्षात आले आणि त्याने सौदी अरेबियाला पलायन केले. निदान त्याचे स्वीस बँकेतले २२ बिलियन डॉलर्सचे खाते तरी गोठवण्यात आले आहे. पश्चिमेने एवढा शहाणपणा यावेळी दाखवला.

ट्युनिशियाच्या सत्तांतरातून स्फूर्ती घेऊन इजिप्तमध्ये अशीच निदर्शने, आत्मदहने झाली. तेथे मोबारक हा हुकूमशहा गेली तीस वर्षे सत्तेवर आहे. इजिप्त हा अरब देशांमधील पश्चिमेच्या दृष्टीने महत्त्वाचा देश आहे कारण त्याची लोकसंख्या सगळ्यात जास्त आहे, त्याने इस्रायलचे अस्तित्व मान्य केले आहे आणि त्या बदल्यात दरवर्षी अब्जावधी डॉलर्सची मदत अमेरिका (पाकिस्तानला करते तशीच) इजिप्तला करते. यातील काही टक्का सरळ मोबारकच्या खिशात जात असे. शिवाय पूर्व आणि पश्चिमेतील व्यापारीदृष्ट्या सागरी वाहतुकीसाठी सुएझ कालवा महत्त्वाचा आहे. तो इजिप्तच्या अखत्यारीत येतो. इस्रायलच्या ऊर्जापुरवठ्यातही इजिप्तचा मोठा भाग आहे. मोबारकचा इरादा आपल्यानंतर (त्यांचे वय ८२) आपल्या मुलाकडे सत्ता सोपवायचा होता. पण ट्युनिशियाप्रमाणेच देशाच्या विविध भागांतून मोबारक हटाव मोहीम सुरू झाल्यावर लष्कराने आपल्याच लोकांवर कारवाई करण्यास नकार दिला आणि मोबारकने राजधानी कैरो सोडून इजिप्तमधील दुसऱ्या शहरात मुक्काम हलवला.

ट्युनिशिया व इजिप्त दोन्ही देशांत त्यामानाने फारशी प्राणहानी न होता सत्तांतरे झाली. पण इतर देशांतील हुकूमशहा हादरले असले तरी सत्ता इतक्या सहजी सोडतील असे दिसत नाही. येमेनमधील हुकूमशहा आजवर अमेरिकेच्या पाठिंब्यावर आणि लष्करी बळावर कसाबसा तगून आहे. विरोधक काही शेकड्यात मारले जात आहेत. अल्-कईदा या आंतरराष्ट्रीय मुस्लिम मूलतत्त्ववादी संघटनेने येमेनमध्ये बस्तान बसवले आहे. त्या विरुद्धच्या कारवाईचा भाग म्हणून अमेरिका राजवटीला पाठिंबा देते. पण लोकांच्या असंतोषापुढे हा हुकूमशहा फार काळ टिकेल असे दिसत नाही.

बहारिन या छोट्या आखाती देशात मुस्लिम धर्मातील शियापंथीय बहुसंख्य आहेत पण सत्ताधारी घराणे सुन्नी आहे. शिया-सुन्नी हाडवैर असते. इराण हा पर्शियन वंशाचा देश प्रामुख्याने शिया आहे. त्याची बहारिनमधील शिया पंथीयांना फूस असल्याचे म्हटले जाते. हे शियापंथीय राजवटीविरुद्ध निदर्शने करू लागले. त्यांच्या शांततापूर्ण विरोधावर बहारीन सरकारने लष्कर लादले. आपले लष्कर विरोध दडपण्यास अपुरे पडत आहे हे लक्षात येताच शेजारच्या सौदी अरेबियातून (सगळ्यात श्रीमंत व कट्टर

सुन्नी मुस्लिम देश) त्यांचे सैन्य आणून सध्यातरी विरोध दडपण्यात आला आहे. पण येमेन, बहारिनमधील हिंसाचार मवाळ म्हणावा अशी परिस्थिती सीरिया व विशेषत: लिबियात आहे.

सीरियात अल्-असाद कुटुंबाची घराणेशाही लष्कराच्या जोरावर ७० सालापासून चालू आहे. २००० सालापर्यंत हाफेज अल असाद सर्वेसर्वा होता नंतर आजवर त्याचा मुलगा बशर सत्ताधीश आहे. तेथे लोकांचा सार्वजनिक ठिकाणी विरोध सुरू होताच बशर असादने गेली ५० वर्षे चालू असलेली आणीबाणी उठवली. पण लोकांना त्याची बाथ पार्टी आणि ते घराणेच सत्तेवरून जायला हवे आहे. या मागणीला लष्कराची व राजवटीची तयारी नाही. त्यामुळे रोज होणाऱ्या मोर्च्यांवर, निदर्शनांवर गोळीबार चालू आहेत. सीरिया मध्यपूर्वेतील श्रीमंत नसले तरी उपद्रवमूल्याच्या दृष्टीने महत्त्वाचे राष्ट्र आहे. इस्रायल पॅलेस्टाईन संघर्ष, लेबनान या शेजारच्या देशांत ढवळाढवळ, इराणशी प्रसंगी जवळीक अशा अनेक प्रकारे सीरिया मध्यपूर्वेत आपले अस्तित्व दाखवून देत असतो. तेथे हस्तक्षेप करणेही पश्चिमेला सहज शक्य नाही कारण अंतर्गत राजकारण बरेच गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे सीरियातील सामान्यांचे बलिदान आणखी काही काळ चालू राहील असे दिसते. या असादच्या वडिलांनी त्यांच्या राजवटीविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून जवळजवळ २०,००० लोकांची एका महिन्यात कत्तल केली होती. या १९८२ च्या घटनेची आठवण सीरियन विरोधकांना आता होत आहे.

या भागातील सर्वात तीव्र युद्धपातळीवरचा संघर्ष लिबिया या देशात चालू आहे. तेथे कर्नल गदाफीची हुकूमशाही गेली चाळीस वर्षे हिंसेच्या अवलंबनाने चालू आहे. लिबियाला इतर अरब देशांतही फारसे मित्र नाहीत. गदाफीने अंतर्गत विरोध दाबण्यास सुरूवात करताच लिबियाविरुद्ध कारवाई करण्याचे पश्चिमेने ठरवले. अरब राष्ट्रांच्या संघटनेनेही या कारवाईला पाठिंबा दिला. अंतर्गत विरोध सुरू झाला. तो लोक शांतपणे रस्त्यावर येऊन व गदाफीने जावे अशी मागणी करत. पण गदाफी, त्याची मुले यांना हे मंजूर नसल्याने त्यांनी विरोधकांवर रणगाडे घातले. मग असंतोष दोन-तीन शहरांपासून देशभर पसरला. आपले लष्कर कदाचित विरोधकांना पाठिंबा देईल ही शक्यता लक्षात घेऊन गदाफीने शेजारच्या आफ्रिकन देशातून भाडोत्री मारेकरी आणले आणि आपल्या लोकांचे हत्याकांड सुरू ठेवले आहे. पूर्व लिबियाचा काही भाग बंडखोरांनी ताब्यात घेतला व पर्यायी सरकार जाहीर केले. मग गदाफीने त्यांच्यावर हवाई बॉम्ब हल्ले सुरू केले. वर म्हटलेली गदाफीविरोधी कारवाई यानंतर पश्चिमेने सुरू केली. त्यात ब्रिटन व फ्रान्सचा पुढाकार आहे. अमेरिकेने फक्त सुरूवातीला सहभाग घेऊ असे सांगितले पण तो सहभाग चालू राहील असे दिसते.

गदाफीने मरेपर्यंत संघर्ष करत राहीन असे जाहीर केले आहे. गदाफीची एकूण कारकीर्द रक्तरंजितच आहे. अल कईदा जन्माला येण्याआधीपासून आंतरराष्ट्रीय आतंकवाद लिबियाने सुरू केला. आपल्या राजकीय विरोधकांना लिबियात तर ठार मारलेच पण जे कोणी देश सोडून गेले, त्यांना त्या-त्या देशांत मारेकरी पाठवून गदाफीने ठार मारलेले आहे. अमेरिकेचे एक प्रवासी विमानही पाडले आहे. पाकिस्तानशी संधान बांधून अणुबॉम्ब बनवण्याचाही प्रयत्न केलेला आहे. या उद्योगांमुळे मध्यंतरीची बरीच वर्षे लिबिया हे आंतरराष्ट्रीय व्यापारातील बहिष्कृत राष्ट्र होते. पण अणुबॉम्बची योजना सोडल्याचे जाहीर करून गदाफीने आपले राजकीय पुनर्वसन दोन-तीन वर्षांपूर्वी सुरू केले. पश्चिमेने अजून तरी सशस्त्र सेना घुसवलेली नाही. पण विरोधकांकडे शस्त्रेही नाहीत किंवा त्यांना युद्धाचे शिक्षणही नाही. अशा स्थितीत लेखाच्या सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे बाहेरील शक्तींना आवाहन करणे एवढेच त्यांच्या आता हातात आहे.

लिबियाच्या प्रश्नाला आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. त्याच्याकडे गदाफी व त्याचा विरोध या गदारोळात दुर्लक्ष झाले आहे. लिबियाची एकूण लोकसंख्या ६५ लाख आहे. त्यात १५ लाख विदेशी मजूर आहे. तेल असल्याने लिबिया बऱ्यापैकी संपन्न देश आहे. त्यामुळे शेजारच्या गरीब आफ्रिकन देशातून मोठ्या प्रमाणावर मजूर लिबियात आले आहेत. देशात अचानक यादवी सुरू झाल्याने आहे त्या चीजवस्तूनिशी देश सोडण्याची त्यांच्यावर वेळ आली आहे. पण देश सोडणे सोपे नाही. कारण आता लिबियन लष्कराने अंतर्गत वाहतुकी कटाक्षाने मर्यादित केल्या आहेत. या लोकांकडे पैसा नाही, त्यांच्या देशाला त्यांच्या सुरक्षेची पर्वा नाही आणि राजवटीला काळजी आहे ती लिबियन विरोध दपडण्याची. हे लोक त्या प्राधान्यक्रमात कोठेच बसत नाहीत. त्यात आणखी भर म्हणून हे सगळे कृष्णवर्णीय आफ्रिकन आहेत. १०-१२ लाखांचे विस्थापन, तेही ६५ लाखांच्या देशात, ही मोठी सामाजिक उलथापालथ आहे. वर म्हटल्याप्रमाणे गदाफीने कृष्णवर्णीय भाडोत्री मारेकरी सैन्य आयात केलेले आहे. (लिबियन अरब उजळ वर्णाचे असतात) त्यामुळे, राजवटीच्या विरोधात असणाऱ्यांना हे निर्वासित कृष्णवर्णीय गदाफीचे भाडोत्री मारेकरी वाटतात आणि त्यांच्यावर हल्ले चालू झालेले आहेत. जे कोणी नशीबवान होते, ते जवळजवळ दीड लाख विदेशी मजूर शेजारच्या ट्युनिशियात आले आहेत. तेथे तात्पुरत्या निर्वासित छावण्यांमध्ये त्यांना ठेवण्यात आले आहे. मुळात हे विस्थापित लोकशाही-राष्ट्र-हुकूमशाही या संदर्भ चौकटीच्याच बाहेरचे आहेत. त्यामुळे त्यांना कोणीच वाली नाही. अशा मुळे तुटलेल्या, तरंगत्या विस्थापितांचे प्रमाण संघर्षग्रस्त अरब देशांत वाढत आहे ही चिंतेची बाब आहे.

**आढावा**

ट्युनिशिया व इजिप्तमधील हुकूमशहा पदच्युत होऊन आता काही महिने झाले. पण तेथे स्थिर राजवटीच्या दृष्टीने प्रगती होताना दिसत नाही. या अस्थैर्यामुळे ट्युनिशियाहून इटलीमार्गे युरोपमध्ये येऊ पाहणाऱ्या निर्वासितांची संख्या अचानक वाढू लागली आहे. हुकूमशहा नको इथपर्यंत त्या-त्या देशांतील विरोधकांचे एकमत

होते. पण हुकूमशहा गेल्यावर पर्यायी राज्यव्यवस्था - अगदी लोकशाही - कशी आणावी याबाबत एकमत दिसत नाही. त्याचा फायदा इस्लामी मूलतत्त्ववादी घेण्याची शक्यता आहे. कारण विरोधकांच्या अनेक गटांपैकी तोच गट संघटित व निश्चित आदर्शवाद असणारा आहे. आजवर कोणत्याच देशात इस्लामी मूलतत्त्ववाद पुढ्यात आला नाही. मागणी आहे ती लोकशाहीची. त्यामुळे दोन प्रमुख परिणाम होणे शक्य आहे. एकतर लोकशाही व्यवस्था आणायला मुस्लिमधर्म व अरब अयोग्य आहेत, त्यांना शरियाचा मागासलेला इस्लाम आणायचा आहे आणि त्याला आळा घालणे हे पश्चिमेचे कर्तव्य आहे, अशा प्रकारच्या पश्चिमेच्या दाव्याचा भोपळा फुटला आहे. लोकशाहीची मागणी लोकांकडूनच, तळागाळातूनच पुढे आली. दोन देशांत सत्तांतरेही झाली. त्यामुळे पश्चिम स्तंभित झाली आहे. कारण नवी राजवट जर खरोखर लोकशाही राजवट असेलच तर ती पश्चिमेचे लांगूलचालन करणारी नसेल ही शक्यता जास्त आहे. ते पश्चिमेला व्यापारीदृष्ट्या सोयीचे नाही. त्यामुळे नव्या राजवटी आपल्याला अनुकूल करणे याकडे पश्चिम लक्ष देईल.

दुसरा परिणाम म्हणजे हुकूमशहांनी दाबून ठेवलेली अंतर्गत वैमनस्ये आता त्या-त्या देशांत बाहेर येत आहेत. इजिप्तमध्ये मुस्लिम अतिरेक्यांनी ख्रिश्चनांची पद्धतशीर हत्या सुरू केली आहे. इस्रायल आणि जॉर्डनला वायू पुरवणाऱ्या पाईपलाईनवर २७ एप्रिलला अज्ञात इजिप्शिअन गँगने हल्ला केला आणि पाईपलाईन फोडली. त्यामुळे त्या दोन देशांना होणारा वायू पुरवठा थांबला आहे. अशा प्रकारचे उद्रेक अनिश्चित व अस्थिर वातावरणात सुरू होतात. हे वाढले तर सामान्य जनता आगीतून फुफाट्यात पडेल.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❐